केवळ खाजगी वितरणाकरीता

ECHOES INDIA

श्री राम चंद्र मिशन ®

मार्च २०१४ खंड ७, अंक २



# पूज्य लालाजी महाराजांचा १४१वा जन्मोत्सव दि. १ ते ४ फेब्रुवारी २०१४

## मणपक्कम

गुरुदेवांनी दि. २ रोजी सकाळी ७.३० वाजता सत्संग संचालित केला. चाकांच्या खुर्चीतून त्यांचे ध्यानकक्षात आगमन झाल्याबरोबर तेथील सुमारे ४००० अभ्यासींनी उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजविण्यास सुरूवात केली. सत्संगानंतर गुरुदेवांनी उपस्थितांना संबोधित केले. या भाषणादरम्यान त्यांनी 'येथे आणि आत्ता' यावर भर दिला. ते म्हणाले, की वेळ कमी आहे त्यामुळे अभ्यासींनी वेळ वाया घालवू नये आणि दैनंदिन साधनेवर त्यांनी लक्ष केंद्रित करावे. ते पुढे म्हणाले की सहजमार्गामुळे कोणत्याही मनुष्याला एकाच जन्मात मुक्ती मिळणे शक्य होते, ज्यासाठी पूर्वी हजारो वर्षे लागत असत.


संध्याकाळी, सत्संगानंतर चेन्नईच्या युवकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. दि. ४ रोजी, वसंतपंचमीच्या दिवशी, गुरुदेवांनी सकाळी ७.३० वाजता सत्संगाचे संचालन केले. त्यानंतर भगिनी माधुरी कृष्णा यांनी 'व्हिस्पर्स' मधील एका संदेशाचे वाचन केले. बंधू कृष्णा यांनी त्यानंतर केलेल्या भाषणात गुरुदेवांच्या आयुष्यातील काही महत्वाच्या प्रसंगांचे कथन केले. गुरुदेवांनी मिशनमधे अभ्यासी म्हणून १९६४ साली वसंत पंचमीच्या दिवशी प्रवेश केला, त्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. भाषणानंतर गुरुदेवांनी केक कापला. ते ध्यानकक्षाबाहेर जात असताना एका रशियन जोडप्याने गुरुदेवांना त्यांचा विवाह संपन्न करण्याची विनंती केली. गुरुदेवांनी त्यासाठी सहमती दर्शविली. गुरुदेव त्यानंतर तात्पुरत्या उपाहारगृहाचे उद्घाटन करण्यास गेले. ध्यानकक्षात बंधू गुरुप्रीत चरण यांनी काही भजने सादर केली. संध्याकाळी ६.३० वाजता समारंभाची सांगता बंधू गणेश आणि कुमारन यांच्या गायनाने झाली. त्यांना भगिनी जयंती यांनी वीणावादनाची साथ दिली.











## तिरूप्पूर – दि. १ ते ४ फेब्रुवारी २०१४

बऱ्याच कालावधीनंतर पूज्य लालाजी महाराजांच्या जन्मोत्सवाचा आंतरराष्ट्रीय भंडारा आयोजित करण्यात आला होता. हा चार दिवसीय भंडारा दि. १ फेब्रुवारीपासून ते तिथीप्रमाणे दि. ४ रोजी येणाऱ्या वसंतपंचमीपर्यंत होता. अभ्यासींनी उत्सवाचे ठिकाण सर्वतोपरी सज्ज केले, भंडारा पूर्ण होईपर्यंत काम केले आणि समारोप करण्यासाठी मदत केली. तिरूप्पूरमधील सर्व व्यवस्था आपल्या अपेक्षेप्रमाणेच उच्च दर्जाची होती. दि.२ पर्यंत अभ्यासींची संख्या, १५०० स्वयंसेवक व १७२९ मुले यांचा समावेश करुन सुमारे १६,५०० झाली होती.

तेथे दररोज सकाळी ६.३० वाजता, ११ वाजता आणि संध्याकाळी ५ वाजता असे तीन सत्संग होत असत. बंधू कमलेश यांनी सत्संगांनंतर पाच भाषणे केली व एकदा प्रशिक्षकांना संबोधित केले. या भाषणांमुळे अभ्यासींना आपल्या अंतरंगात खोलवर जाण्यास, आपले आकलन वाढविण्यास व जे महत्वाचे आहे त्यावर लक्ष केंद्रित करण्यास मदत झाली.

गुरुदेवांची आध्यात्मिक उपस्थिती उत्सवाच्या प्रत्येक गोष्टीमध्ये जाणवत होती. त्यांना भौतिक अर्थाने उपस्थित राहता आले नसले तरी दि.२ रोजी सकाळच्या सत्संगानंतर ते उपस्थितांना संबोधित करीत असताना चेन्नईहून वेबलिंक द्वारे सर्वजण त्यांना पाहू शकले. उत्सव समितीचे अध्यक्ष या नात्याने बंधू कमलेश यांनी सर्वांना आपले आचरण वातावरणातील तरल कंपनांशी जुळवून घेण्यास प्रोत्साहीत केले. त्यामुळे तेथे नैसर्गिक शिस्त दिसून येत होती.

दि. २ रोजी सकाळच्या ६.४५ च्या सत्संगानंतर बंधू कमलेश यांनी चार विवाह संपन्न केले व दि. १ फेब्रुवारी रोजी प्राप्त झालेल्या व्हिस्पर्स मधील संदेशाचे वाचन केले. काही नवीन पुस्तकांचे व छायाचित्रांचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर बंधू गुरप्रीत व बंधू पियुष यांनी भजने सादर केली.

बंधू कमलेश यांच्या पहिल्या भाषणादरम्यान त्यांनी लालाजींची 'संभाषणाची तत्त्वे' वाचून दाखवली. आपल्या संभाषणाची शैली ही आपल्या मनाच्या संतुलित अवस्थेचे, आपल्या हृदयाच्या शुध्दतेचे आणि चारित्र्याचे प्रतिबिंब असू शकते याविषयी विचार करण्यास लालाजी महाराज आपल्याला उद्युक्त करतात.

त्यानंतरच्या भाषणांमधे बंधू कमलेश यांनी निर्धारीत प्रकारे, नियमित साधना करण्याचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित केले. आपल्या दैनंदिन जीवनातील गोष्टी उदा. आपल्या संभाषणाची रीत, आपले खाणे–पिणे इत्यादि आपल्यामध्ये संस्कारांची निर्मिती करण्यास कारणीभूत ठरतात याविषयी त्यांनी सांगितले. ध्यानानंतरच्या आपल्या अवस्थेवर खोल विचार करण्याच्या तसेच ती टिकविण्याचा प्रयत्न करण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला. दि. ४ फेब्रुवारीच्या समारोपाच्या भाषणात त्यांनी प्रत्येकाचे अभिनंदन केले व या वर्षी लालाजी महाराजांनी सुरू केलेल्या सुसंघटीत सत्संगांना १०० वर्षे पूर्ण झाल्याचे संगितले. दि. २ रोजी त्यांनी कायम स्वरूपी ध्यान कक्षामध्ये सर्व प्रशिक्षक, केंद्र प्रमुख व विभाग प्रमुख यांना संबोधित केले आणि दि. ३ रोजी सर्व स्वयंसेवकांसाठी एका खास सत्संगाचे संचालन केले.

आयोजकांनी आवारात सभोवती विविध विषयांवरील सुंदर पोस्टर्स (भित्तीचित्रे) लावली होती. ध्यानकक्षाबाहेर लालाजी महाराजांवरील एक सादरीकरण होते. उपहारगृह व लहान मुलांच्या केंद्रासमोर चारित्र्य निर्माण व दहा नियमांवरचे मनोवेधक असे प्रदर्शन होते. कुटिराजवळचा परिसर शांतता परिसर म्हणून घोषित करण्यात आला होता. तेथे या परिसराचा हृदयावर आधरित मूक आत्मपरिक्षणासाठी व ध्यानासाठी कसा वापर करावा या विषयांवरील पोस्टर्स लावण्यात आली होती.

लहान मुलांच्या केंद्रामध्ये मुलांची विभागणी तीन वयोगटात केली होती. चिमुकली बाळे/मुले (०–६ वर्षे) छोटे तारे (७–१२ वर्षे) आणि किशोरवयीन (१३–१७ वर्षे). नैतिक मूल्ये बिंबवणाऱ्या व सहजमार्गाचा अर्थबोध करून देणाऱ्या विविध उपक्रमांद्वारे गुंतवून ठेवणाऱ्या समर्पित अशा स्वयंसेवकांचा गट प्रत्येक वयोगटासाठी होता. त्यांचे विशेष कौशल्य दाखवणारा एक सांस्कृतिक कार्यक्रम झाला.



## मणपक्कम येथील बातम्या

**दि.२ ते १४ डिसेंबर, २०१३**

**प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा**

यापूर्वीच्या एकोजमध्ये नमूद केल्याप्रमाणे सुमारे वीस प्रशिक्षणार्थींच्या गटांना मणपक्कम येथे प्रशिक्षक बनण्याच्या प्रशिक्षणासाठी आमंत्रित करण्यात येते. रोज सकाळी प्रशिक्षकांना बोलावले जात होते आणि त्यांना गुरुदेव सिटींग देत होते. एक–दोनवेळा त्यांनी प्रशिक्षणार्थींच्या गटाला संबोधित केले. एकदा ते सर्व प्रशिक्षणार्थींना वैयक्तिकपणे भेटले. प्रशिक्षणार्थींना अंतिम सिटींग्ज चार दिवसात विभागून देण्याची योजना होती पण दि. ६ डिसेंबर, २०१३ रोजी सर्वांना अंतिम सिटींग देण्याचे गुरुदेवांनी ठरवले. सिटींग्ज झाल्यानंतर त्यांनी प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षक प्रमाणपत्रांचे वाटप केले तेव्हा गुरुदेवांच्या चेहऱ्यावरचे समाधान सर्वांना जाणवत होते.

**रविवार दि. १५ डिसेंबर, २०१३**

बंधू कमलेश पटेल यांनी सत्संग संचालित केला आणि श्रोत्यांना संबोधित केले. गुरुदेवांना अभ्यासींविषयी जे वाटते ते निरपेक्ष प्रेम आणि आपण जे प्रेम करतो ते अपेक्षांसहित असते असे ते यावेळी म्हणाले.

**निद्रा विशेषज्ञ**

गुरुदेवांनी यु.एस.ए. हून आलेल्या निद्रा विशेषज्ञ असलेल्या डॉक्टरांसमवेत सुमारे अर्धा तास व्यतीत केला. गुरुदेवांना त्यांच्या कामाबद्दल कुतूहल वाटत होते. डॉक्टरांनी शरीरामधील अनेक प्रकारच्या कमतरतांमुळे कशा झोपेच्या समस्या निर्माण होतात हे स्पष्ट केले. त्यानंतर ते म्हणाले की, गुरुदेवांनी दररोज नारळपाण्याचे सेवन केले पाहिजे. गुरुदेव हसून म्हणाले "मला नारळपाणी आवडते आणि मला जे आवडते ते सुचविणारे डॉक्टरसुद्धा मला आवडतात" हे ऐकून त्या कक्षामध्ये चांगलाच हशा पिकला.

**श्रीलंका**

डिसेंबरच्या मधल्याकाळात एकदा गुरुदेव त्यांच्या कुटीरासमोर उन्हात बसलेले असताना परिसंवादासाठी मणपक्कम येथे जमलेले सुमारे साठ श्रीलंकन अभ्यासी तिथे आले. श्रीलंकेमध्ये केंद्रांची संख्या वाढत असल्यामुळे त्यांना अधिक प्रशिक्षकांची गरज आहे असे त्यांनी गुरुदेवांना सांगितले. हे ऐकून गुरुदेवांना अतिशय आनंद वाटला.



**उन्हातील सत्रे**

गुरुदेव नियमितपणे बाहेर येऊन त्यांच्या कुटीरासमोर आणि क्वचित कुटीरामागे उन्हात बसतात. ही सत्रे (उन्हातील सत्रे) कधी चर्चाभिमुख तर कधी नि:शब्द अशी असतात. याचा संदर्भ देऊन गुरूदेव म्हणाले, "मला माझ्या भोवती केवळ सूर्यप्रकाशच नव्हे, तर माणसेसुद्धा असावित असे वाटते. केवळ सूर्यप्रकाश नव्हे, तर हृदय (महत्त्वाचे) आहे. हा इच्छा, मानवी हृदय आणि सूर्यप्रकाश यांचा मिलाफ आहे."

दि. २२ डिसेंबर, २०१३ रोजी गुरुदेवांवर त्वचा प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यातून बरे होण्याकरीता त्यांना काही दिवसांचा कालावधी लागला.

**नाताळ :** बुधवार दि. २५ डिसेंबर,२०१३ :

गुरुदेव लवकर जागे होऊन सकाळी सात वाजण्यापूर्वीच तयार झाले. ते खूपच प्रसन्न दिसत होते. त्यांच्या सभोवती असणाऱ्या सर्वांना त्यांनी नाताळच्या शुभेच्छा दिल्या. ध्यानगृहामध्ये जाऊन सत्संग संचालित करण्याचा त्यांचा मनोदय होता, पण नुकत्याच झालेल्या शस्त्रक्रियेमुळे त्यांना पाय वर ठेवुनच बसावे लागत असल्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांनी तो रहित केला. त्यांचा नाश्ता झाल्यानंतर दिवाणखान्यात जमा झालेल्या सुमारे शंभर अभ्यासींकरीता गुरुदेवांनी सत्संग संचालित केला. त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या आणि श्रवण करणे, अर्थावर ध्यान करणे आणि जे शिकले आहे ते आत्मसात करणे या विषयांवर ते बोलले. असे झाले नाही तर आपण सुशिक्षित होतो, पण



शिकत नाही असे ते म्हणाले. एक तास चाललेला सत्संग व सुमारे पाऊण तासाचे भाषण असे हे मोठ्या कालावधीचे सत्र होते.


### जानेवारी, २०१४

गुरुदेव दि.८ जानेवारी रोजी बंधू कमलेश यांच्या नवीन घरी गेले होते. बंधू कमलेश यांनी गुरुदेवांची चाकांची खुर्ची दुतर्फा उभ्या असणाऱ्या अभ्यासींच्या रांगेमधून पुढे नेली. गुरुदेवांनी फीत कापून आत प्रवेश केला आणि प्रसादाचे वाटप केले. बंधू कमलेश यांनी गुरुदेवांना घर दाखवले. गुरुदेवांनी सत्संग संचालित केला पण सुमारे ३५ मिनिटानंतर एक भ्रमणध्वनी वाजल्यामुळे सर्वजण विचलित झाले आणि काही वेळातच गुरुदेवांनी सत्संग थांबविला. गुरुदेव अस्वस्थ झाले आणि त्यांनी कडक शब्दांत समज दिली. नंतर शयनकक्षामध्ये बोलताना ते म्हणाले की "सिटींग अनन्यसाधारण होते पण

continued...







भ्रमणध्वनीच्या आवाजाने मी विचलित झालो आणि मला ते थांबवावेच लागले.”

गुरुदेवांनी बंधू कमलेश यांच्या घरी राहण्याचे ठरवले नव्हते पण नंतर यांनी आपला विचार बदलला आणि तेथे काही दिवस राहण्याचे ठरवले. ‘गुरुदेवांचे वास्तव्य घ–रामध्ये असावे याकरीता तरल आणि आध्यात्मिक वातावरण टिकवून ठेवणे आवश्यक आहे’ यावर गुरुदेवांनी भर दिला. तिथे मुक्कामास असताना गुरुदेवांनी ईराण, पिठोरगढ इत्यादि ठिकाणांहून आलेल्या अभ्यासींच्या गटांची भेट घेतली. एके संध्याकाळी ते शंभराहुन अधिक अभ्यासी असलेल्या कक्षामध्ये बसले होते आणि सर्वांसोबत संवाद साधताना त्यांनी वेळ आनंदाने व्यतीत केला.

**१४ जानेवारी २०१४ : पोंगल**

गुरुदेव सकाळी लवकर तयार झाले आणि त्यांच्या कक्षामध्ये उपस्थित काही जणांना त्यांनी अभिवादन केले. कुटीराबाहेर रांगेत उभ्या असलेल्या सर्व अभ्यासींना शांतपणे अभिवादन करीत गुरुदेवांनी ध्यानकक्षाकडे प्रस्थान केले. सत्संगानंतर भजनाचा कार्यक्रम झाला. सत्संगानंतर गुरुदेव थकलेले होते पण तरीही ते बाहेर आले आणि उन्हामध्ये बसले. पिठोरगढ या केंद्रामधून आलेल्या सुमारे दीडशे अभ्यासींना कुटीराच्या प्रांगणात येण्याची परवानगी देण्यात आली होती. त्यानंतर ओमेगा वसतीगृहातील सुमारे पंचवीस विद्यार्थीसुद्धा आत आले आणि त्यांनी गुरुदेवांची भेट घेतली. गुरुदेव तिथे बसलेले असताना तिरुवल्लुर येथील नियोजित आश्रमाच्या काही आराखड्यांविषयी बंधू कृष्णा आणि बंधू कमलेश यांच्याशी त्यावर चर्चा केली.

**बुधवार, दि. १५ जानेवारी: तिरुवल्लूर कुटीराचे भूमिपूजन**

प्रात:काळच्या ध्यानानंतर गुरुदेवांना खूपच थकवा जाणवू लागला. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नाईलाजाने त्यांनी भूमी पूजनासाठी









तिरुवल्लुरला जाणे रद्द केले. त्यांनी बंधू कमलेश यांना तेथे जाण्याविषयी सांगितले. तिरुवल्लुरहून परतल्यावर बंधू कमलेश यांनी तेथील कार्यक्रम सुरळीत पार पडल्याचा व कार्यक्रमास जवळजवळ दीड हजार अभ्यासी उपस्थित असल्याचा वृत्तांत गुरुदेवांना सांगितला.

**गुरुदेवांची प्रकृती**

या महिन्याच्या मध्यावर गुरुदेवांना सर्दी–खोकल्याचा संसर्ग झाला होता. त्यामुळे डॉक्टरांनी त्यांच्या कक्षात इतरांनी प्रवेश करण्यावर बंधने लागू केली होती. गुरुदेव म्हणाले, "मी आजारी असताना कोणाला न भेटणे चांगलेच आहे; कारण माझ्यामुळे त्यांना जंतूसंसर्ग होऊ नये अशी माझी इच्छा आहे." या काळात ते संगीत ऐकत व पुस्तके वाचून घेत असत.

**जानेवारी १८ ते २४: आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्ती प्रशिक्षण कार्यक्रम (आय.एस.टी.पी.)**

गुरुदेवांच्या प्रकृती अस्वास्थ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशिक्षक पूर्वतयारीचे हे सत्र गुरुदेवांसाठी खूपच प्रदीर्घ होते. रविवारी गुरुदेव आयएसटीपीमधील सहभागींना भेटले आणि त्यांनी त्यांना एक सिटींगही दिले. तीस अभ्यासींना प्रशिक्षक बनविण्यात येणार होते. अशा प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षक म्हणून तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या पूर्वतयारीचे कामकाज त्यांनी काही प्रशिक्षकांना नेमून दिले. आठवड्याच्या सुरुवातीला गुरूदेवांची प्रकृती अस्–वस्थ असूनही शुक्रवारपर्यंत हे काम ते पूर्ण करू शकले. प्रशिक्षणातील शेवटच्या सिटींगनंतर ते सर्व नूतन प्रशिक्षकांना भेटले व त्यांनी स्वहस्ते प्रत्येकाला प्रसाद व प्रशिक्षक झाल्याबद्दलचे प्रमाणपत्र प्रदान केले. ते म्हणाले, "या कामात व्यत्यय येऊ नये म्हणून मी सिटींग पूर्ण होईपर्यंत खोकल्याची उबळ दाबून धरली होती."

**रविवार, दि. २६ जानेवारी २०१४**

गुरुदेवांनी बंधू संस्कृत कन्नन यांचे गीतेवरील प्रवचन ऐकले. त्यांची मनःस्थिती उत्तम होती. संध्याकाळी सत्संग सुरु असताना त्यांनी आश्रमात एक फेरफटकाही मारला. संध्याकाळी पावणे सहा वाजता ते आफ्रिकेतून आलेल्या अभ्यासींना कुटीराच्या बाहेर भेटले. कुटीराच्या समोर जमलेल्या अभ्यासींशी गुरुदेव बराच वेळ बोलत होते.

**३१ जानेवारी २०१४– चिनी नूतन वर्ष**

गुरुदेवांना भल्या पहाटेच जाग आली आणि त्यांची प्रकृतीही उत्तम होती. कुटीराच्या बाहेर बसल्यामुळे ते अत्यंत उत्साही व आनंदी झाले होते. त्यावेळी चिनी अभ्यासी कुटीरामध्ये आले व त्यांनी गुरुदेवांना काही भेटवस्तु दिल्या. गुरुदेवांनी चिनी भाषेतून त्यांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

अभ्यासींना घेऊन तिरुप्पूरला प्रयाण करण्यासाठी तीन बसेस तयार होत होत्या. परिवहनप्रमुखाची भेट घेऊन गुरुदेवांनी त्यांना सर्व बसेसनी एकमेकांच्या नजरेच्या टप्प्यात राहून एकापाठोपाठ एकत्रच प्रवास कसा केला पाहिजे या विषयी सूचना दिल्या.

न्याहरीनंतर गुरुदेव कॅनडीयन अभ्यासींना कुटीराच्या आवारात भेटले. कॅनडीयन अभ्यासींनी त्यांना एक नवीन आश्रम प्राप्त झाल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ केक कापला. गुरुदेवांनी त्या सर्वांचे अभिनंदन केले व सर्वांना केकचे वाटप केले.





# समुद्रतटीय केंद्रांचा (ओशनिया) परिसंवाद

**दि. ७ ते १२ जानेवारी २०१४, बाबूजी मेमोरियल आश्रम, मणपक्कम**

ऑस्ट्रेलिया, फिजी, न्यू कॅलेडोनिया, न्यूझीलंड इ. देशातील समुद्रतटीय केंद्रांमधील अभ्यासी दि. ७ जानेवारी ते १२ जानेवारी दरम्यान बाबूजी मेमोरियल आश्रमात परिसंवादासाठी जमले होते. परिसंवादास जोडून त्यापूर्वी दि. ४ ते ६ जानेवारी दरम्यान प्रशिक्षकांची एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. प्रकृती ठीक नसतानाही गुरुदेवांनी दि. ४ रोजी चाळीस प्रशिक्षकांसाठी सत्संग संचालित केला. त्यानंतरचे त्यांचे भाषण अतिशय हृदयस्पर्शी होते. त्यानंतर गुरुदेवांनी त्या प्रशिक्षकांसमवेत एक तास कुटीराच्या प्रांगणात व्यतीत केला. प्रेक्षागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेमुळे सहभागी प्रशिक्षकांना मौलिक विचारधन व मर्मज्ञान प्राप्त झाले.

दि. ७ जानेवारी रोजी सकाळी २०० हून अधिक सहभागींसह ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड मधील केंद्रांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेने समुद्रतटीय परिसंवादाचा प्रारंभ झाला. बंधू कमलेश यांनी समुदायापुढे भाषण केले. आत्मचिंतन, वैयक्तिक सिटींग आणि वाचनालय व पुस्तक भांडारास भेट देण्यासाठी दुपारच्या सत्रात वेळ देण्यात आला होता. युवा अभ्यासींनी सादर केलेल्या कार्यक्रमामुळे सहभागींमध्ये सुरेख असे बंध निर्माण झाले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे गुरुदेवांच्या हालचाली जरी पडद्यामागून होत होत्या तरी कार्यक्रमास झालेला त्यांचा परिसस्पर्श स्पष्टपणे जाणवत होता. प्रेक्षागृहात प्रवेश केल्याक्षणापासूनच सर्व कार्यक्रमांमध्ये गुरुदेवांचे मार्गदर्शन व त्यांच्या प्रेमाचा ओलावा सर्वांना अनुभवास येत होता.

दि. १० रोजी संध्याकाळी बंधू कमलेश यांनी युवा अभ्यासींना संबोधित केले. "दैनंदिन जीवनातील खाणे–पिणे, झोपणे, संभाषण इ. साध्या कृतींमध्येही आध्यात्मिक दृष्टी जोपासण्यासाठी वेळेचा सदुपयोग कसा करावा?" या विषयी त्यांचा संदेश स्पष्ट होता.

दि. ११ च्या संध्याकाळी प्रकृती बरी नसतानाही गुरुदेव सहभागींना कुटीराच्या आवारात भेटले व त्यांच्याशी नैतिक आचरणासंबंधी बोलले. त्यानंतरचे सिटींग अत्यंत सखोल असे होते. न्यूझीलंडमधील भगिनींनी मावरी भाषेतील एक गीत म्हटले. त्यानंतर गुरुदेव विश्रांतीसाठी आपल्या अभ्यासिकेत गेले. रविवार सकाळचा गुरुदेवांनी संचालित केलेला सत्संग म्हणजे या परिसंवादाचा नितांतसुंदर असा जणू कळस होता. समारोपाच्या भाषणात बंधू कमलेश यांनी सहभागींना प्राप्त झालेली अवस्था सतत टिकवून ठेवण्याच्या आवश्यकतेवर तसेच सहभागींनी स्वगृही परतल्यावर वेळेचा उपयोग अधिक चांगल्या प्रकारे कसा करावा यावर भर दिला.



# आफ्रिकन परिसंवाद

**मणपक्कम – जानेवारी २०१४**



***"विश्वास ठेवा, तुम्ही येथे माझ्यापाशी असाल किंवा नसाल पण मी नेहमीच तुमच्या सोबत असेन."***

दि. २० जानेवारी पर्यंत आफ्रिकन परिसंवादासाठी बोट्स्वाना, कॅमेरून, इजिप्त, केनिया, मादागास्कर, मॉरिशस, मोरोक्को, रियुनियन, दक्षिण आफ्रिका, टान्झानिया, युगांडा इ. तेरा देशांमधील येणाऱ्या १६३ प्रतिनिधी अभ्यासींपैकी बहुतेक सर्वांचे मणपक्कम येथे आगमन झाले होते. सकाळी ६.३०, ९.०० आणि संध्याकाळी ५.०० वाजता असे तीन सत्संग रोज संचालित केले जात होते तर दुपारचा वेळ वैयक्तिक सिटींगसाठी देण्यात आला होता. त्या व्यतिरिक्त भाषणे, पूज्य गुरुदेवांच्या भाषणांचे व्हीडियो, अभ्यासींसाठी, समन्वयकांसाठी तसेच प्रशिक्षकांसाठी कार्यशाळा आणि गुरुदेवांसोबत बैठक इ.चा परिसंवादात समावेश होता.

बंधू कमलेश व बंधू राजेश राठोड यांनी सहभागींसमोर भाषणे केली. या भाषणांतून त्यांनी पुढील वाटचाली संदर्भात दिशानिर्देशन व स्पष्टीकरण केले.

गुरुदेवांनी आदल्या दिवशी आय.एस.ए.डब्ल्यू. गटापुढे दिलेल्या भाषणाचा व्हीडियो अभ्यासींनी पाहिला. गुरुदेव त्यात म्हणतात, "प्रत्येक अभ्यासीने मेणबत्ती प्रज्वलित करणाऱ्या काडेपेटीतील काडीप्रमाणे बनले पाहिजे. आम्ही आधी स्वत:मध्ये परिवर्तन केले पाहिजे व परिणामस्वरूप आमच्या आचरणातून व आमच्या कृतींमधून इतरांमध्ये परिवर्तन घडवून आणले पाहिजे."

सहभागींमध्ये एकात्मतेची भावना वाढीस लागावी व परस्परसंवाद व्हावा या हेतूने सहभागींचे लहान गट पाडण्यात आले. प्रत्येकाने स्वत:चा परिचय करून दिल्यावर प्रत्येक प्रतिनिधीला स्वत:विषयी तीन साध्या प्रश्नांची उत्तरे द्यावयाची होती. हा स्वाध्याय मानवीय स्तरावर अतिशय भावूक व हृदयस्पर्शी ठरला. आसू आणि हसू यांच्या अनोख्या मिलाफातून आफ्रिकन बंधू भगिनी एकमेकांना अधिक चांगल्या प्रकारे ओळखू लागले व त्यांच्यामधील बंध आणखीनच दृढ झाल्याचे स्पष्ट दिसून आले.

पहिल्या दिवशी नवीन अभ्यासींचा गुरुदेवांशी परिचय करून देण्यात आला. आणखी एके दिवशी या समूहासाठी गुरुदेवांनी एक सत्संग संचालित केला. दि.२६ जानेवारी रोजी संध्याकाळच्या सत्संगानंतर त्यांना गुरुदेवांची भेट घेण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. या सत्रात गुरुदेवांनी आफ्रिकन प्रतिनिधींना वाटणाऱ्या भय व चिंतांविषयी मार्गदर्शन केले.

# पूज्य लालाजी महाराजांच्या जन्म दिवसाचा समारंभ – भारत


जोधपूर


मुंबई


भिलवाडा


कोलकाता


उस्मानाबाद


लखनौ


हुबळी


चिखली


वरणगाव


गुलबर्गा

## अखिल भारतीय निबंध लेखन कार्यक्रम २०१३

संयुक्त राष्ट्रांचे माहिती केंद्र – भारत आणि भूतान (यु.एन.आय.सी.) आणि श्री राम चंद्र मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी आंतरराष्ट्रीय युवा दिवसाचे औचित्य साधून या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. हे या दोन्ही संस्थांच्या भागीदारीचे नववे वर्ष होते. प्रथम गटासाठी (इयत्ता ९ वी ते १२ वी) निबंधाचा विषय गुरुदेवांनी ओमेगाच्या विद्यार्थ्यांसमोर दि–लेल्या "जेव्हा हृदये खुली असतात तेव्हाच मने खुली होतात" या भाषणावरून घेण्यात आला होता. दुसऱ्या गटाकरीता (पदवीपूर्व आणि पदव्युत्तर) हेन्री डेव्हिड थोरो यांचे एक विचार करण्यास प्रवृत्त करणारे वाक्य– "तुम्ही एखाद्या गोष्टीकडे कसे पाहता हे महत्वाचे नसून त्या गोष्टीकडे पाहण्याचा तुमचा दृष्टीकोन कसा आहे हे महत्वाचे आहे" हा विषय म्हणून देण्यात आला होता. सहभागी झालेल्यांना त्यांच्या विषयावर चर्चा करण्याची व संशोधन करण्याची मुभा देण्यात आली होती. परंतु त्याच वेळी त्यांनी आत्मपरीक्षण करून स्वत:चे



शिवगंगै


बीवर


बेल्लारी


कोलकाता


औरंगाबाद



रांची

आकलन प्रस्तुत करणे अपेक्षित होते. यावर्षी १२,१९३ शैक्षणिक संस्थांमधून १,७८,५८९ विद्यार्थी सहभागी झाले होते.

पहिल्या गटामध्ये डॉ. ए. एन. खोसला डीएव्ही पब्लिक स्कूल, राउरकेला येथील हर्षिता चारी (विभाग क्र.१४, ओडिशा) हिने प्रथम पारितोषिक पटकावले. दुसऱ्या गटामध्ये जयपूर येथील जयपूरीया व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेच्या अंकुर चक्रवती याने (विभाग क्र. ७, राजस्थान) प्रथम पारितोषिक पटकावले. या दोघांनाही ट्रॉफी तसेच यु.एन.आय.सी. चे संचालक व श्री राम चंद्र मिशनचे अध्यक्ष यांनी संयुक्तपणे स्वाक्षऱ्या केलेले प्रशस्तिपत्रक देण्यात आले. या दोन्हीही पारितोषिक विजेत्यांचे निबंध मिशनच्या वेबसाईटवर प्रकाशित करण्यात आले आहेत.

दरवर्षी प्रमाणे या वर्षीसुद्धा मिशनच्या सगळ्या विभागांमध्ये निबंध लेखन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. (२०१३ मध्ये ३० विभाग) या उपक्रमाला संपूर्ण भारतातून भरभरून प्रतिसाद मिळाला. विविध केंद्रामध्ये पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी तेथे पारितोषिक विजेत्यांबरोबरच पालक आणि शिक्षकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाविषयीचे अहवाल दक्षिण तामिळनाडू (परमकुडी, कोविलपटटी, तिरुप्पूर, गोपिचेटटीपलायम, सिवगंगै), महाराष्ट्र (चिखली, अहमदनगर, मुंबई, उस्मानाबाद, पुणे, पैठण), उत्तर प्रदेश (औरंगाबाद, बरेली, हरदोई, मीरत, मुरादाबाद, लखनौ, शहाजहांपूर), उत्तर कर्नाटक (गुलबर्गा, हुबळी, बसवकल्याण, बेल्लारी, बेळगाव), केरळ (अलुवा, पालक्कड), रांची, दिली, प. बंगाल (सिलिगुडी, खरगपूर, राणीगंज, कोलकाता), राजस्थान (बीवर, बाली), आंध्र (कुर्नूल) आणि पंजाब (जालंधर) येथून आले आहेत.


राणीगंज


कोविलपटटी


मुरादाबाद


बाहेरी


पैठण


पालक्कड


पुणे


झिरो


सिलिगुडी

## मुलांचे कार्यक्रम



### पुलगांव आश्रम, महाराष्ट्र

दि. २५ डिसेंबर २०१३ रोजी १४० मुलांसाठी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सांताक्लॉजच्या वेषातील एका अभ्यासीने मुलांचे स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात ओमेगाच्या मुलांसोबत असलेल्या गुरुदेवांच्या व्हिडियोने झाली. मुलांना विविध खेळांमध्ये आणि कल्पक अशा उपक्रमांमध्ये गुंतवून ठेवण्यात आले होते. त्यामुळे चारित्र्य निर्माण आणि नैतिक जीवन यांसाठी आवश्यक असणारी मूल्ये अंगी बाणविण्यास सहाय्य झाले. पालकांसाठी एक स्वागत कक्ष ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमाची सांगता गच्चीवरील बागकामाच्या प्रात्यक्षिकाने झाली. उजळलेल्या चेहेऱ्याने आणि पुढील कार्यक्रमात लवकरच सहभागी होण्याच्या आतूरतेने सर्व मुले घरी परतली.

### लुधियाना आश्रम, पंजाब

दि. ५ जानेवारी रोजी जवळजवळ २२ मुलांनी बागकामाच्या सत्रात सहभाग घेतला. मुलांचे तीन गट करण्यात आले व त्यांना व्यावसायिक वापरातील झाडांबद्दल, त्यांच्यावर मारण्यात येणाऱ्या अत्यंत हानीकारक अशा कीटक व कीडनाशकांबद्दल व कृत्रिम खतांविषयी माहिती देण्यात आली. त्यांनी माती एकत्र करून कुंड्यांमध्ये भरली, अनेक झाडांच्या बिया व छोटी रोपे पेरली व त्यांना योग्य जागांवर ठेवले. गुणविषेश शिकण्याच्या उपक्रमामुळे त्यांचे शब्द भांडार वाढले. 'हरिताकडे (निसर्गाकडे) का जावे?' या विषयावर आधारित लिखाण सत्रादरम्यान त्यांना पाच 'आर' (रिफ्युज–नकार, रिसायकल–पुनर्निमाण, रीचार्ज–पुन: प्रभारण, रीयुज–पुनर्वापर, रिड्युस– कमी वापर) यांचा वापर करून आपले विचार व्यक्त करता आले.




### जबलपूर आश्रम, मध्य प्रदेश

दि. २२ ते २५ डिसेंबर दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या हिवाळी शिबिरात पासष्ट मुलांनी भाग घेतला. आध्यात्मिक वातावरणात मूल्याधारित शिक्षण देण्याच्या हेतूने या कार्यक्रमाची आखणी करण्यात आली होती. समर्पित वृत्तीच्या स्वयंसेवकांनी पुढाकार घेऊन या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. या कार्यक्रमामध्ये व्यायाम, खेळ, बागकाम, चित्रकला व हस्तकला, प्रश्नमंजुषा, मूल्याधारीत गोष्टी, प्रोत्साहनपर सादरीकरणे, प्रेरणादायक सिनेमे, तसेच मुलांनी स्वत: आयोजित केलेले सांस्कृतिक कार्यक्रम असे विविध उपक्रम होते. याशिवाय यावेळी मुलांची आरोग्य तपासणीही करण्यात आली.

### कोलकाता, प. बंगाल

दि. २९ डिसेंबर रोजी बी.एम.ए कोलकाता यांनी अर्ध–दिवसीय क्रीडादिन आयोजित करून त्यांचा दहावा वर्धापन दिन साजरा केला. कार्यक्रमाची सुरुवात बगिच्यामध्ये मुलांच्या नृत्याने झाली. यानंतर सर्व वयोगटांसाठी विविध क्रीडा उपक्रम राबविण्यात आले. अडथळ्यांची शर्यत, तीन पायांची शर्यत, मुलांसाठी संगीत खुर्ची इ. खेळ प्रमुख आकर्षण होते. दहा सूत्रांवरील एक खेळ घेण्यात आला, ज्यामध्ये जवळ जवळ सर्व अभ्यासी सहभागी झाले. कार्यक्रमाची सांगता पारितोषिक वितरणाने झाली. यानंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.










## युवकांसाठी कार्यक्रम

### युवा मेळावा, अलुवा, केरळ

वलियापरंबु, कोडुंगल्लुर, एर्नाकुलम, अंबाल्लुर, कालडी, थिल्लुर, पुलनी आणि अलुवा येथील युवकांची दि.१५ व १६ फेब्रुवारी रोजी येथील विभागीय आश्रमात बैठक झाली. हा कार्यक्रम युवकांच्या अशा बैठकीतून काय अपेक्षा आहेत हे शोधण्यासाठी होता. गट चर्चा आणि परस्पर संवादादरम्यान युवकांना नियमित साधना करण्यास कसे प्रोत्साहित करावे तसेच इतर युवकांना या पद्धतीकडे आणि सहजमार्गाचे विविध पैलू इत्यादिंकडे कसे आकर्षित करावे अशा मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. गुरुदेवांचे ‘हृदयापासून ऐका’ हे भाषण ऐकल्यावर एक प्रश्नोत्तरांचे सत्र झाले. विभाग प्रमुख बंधू मोहन यांनी सहजमार्ग साधना कुठल्याही मनुष्याच्या आत्मधर्माशी कशी सुसंगत आहे याचा उल्लेख केला आणि सकाळच्या चर्चेमधून आलेल्या वेगवेगळ्या प्रश्नांचे समाधान केले.

### विभागीय युवक चर्चासत्र, गौहत्ती, आसाम

दि. ११ व १२ जानेवारी रोजी गौहत्ती आश्रमात ‘परिवर्तन’ या विषयावरील दोन दिवसीय निवासी चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रामध्ये आसाम, नागालँड, मणिपूर आणि मेघालयातील बावन्न अभ्यासी उपस्थित होते. ज्येष्ठ अभ्यासींची भाषणे, सांघिक चर्चा, आत्मपरिक्षण आणि प्रश्नोत्तरांचे सत्र या सर्वांमुळे सहजमार्गाबद्दल अधिक जाणण्याची संधी मिळाली. मेळाव्याच्या शेवटी सहभागींना त्यांच्या अनुभवांविषयी दैनंदिनीत लिहिण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. एका सक्षम अशा गुरुचे जीवनातील महत्त्व यावर प्रकाशझोत टाकणारा एक लघुपट दाखविण्यात आला. सहभागी अशा प्रकारची आणखी चर्चासत्रे आणि क्रेस्टच्या कार्यक्रमांस उपस्थित राहण्यास उत्सुक होते.

### बडोदा

बडोद्याच्या युवकांसाठी एक वार्षिक स्नेहसंमेलन दि.२९ डिसेंबर २०१३ रोजी आयोजित करण्यात आले होते. सुमारे पंचाहत्तर तरुण अभ्यासी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. सर्वांसाठी ‘खजिन्याचा शोध (ट्रेजर हंट)’ हा खेळ घेण्यात आला तसेच कामाच्या ठिकाणी स्वसंरक्षण कसे करावे यावर अभ्यासी भगिनींसाठी एक सत्र झाले. नंतर एक शेकोटी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी एका अभ्यासीने गायलेल्या संगीताचा आस्वाद सर्वांनी घेतला. कार्यक्रमाचा शेवट ९ वाजताच्या प्रार्थनेने झाला.

### दिल्ली

गाझियाबाद, नोएडा, गुरगाव आणि दिल्लीच्या सर्व भागांतील अभ्यासींसाठी एक निवासी कार्यक्रम आर.के.पुरम आश्रम येथे जानेवारी २०१४ मध्ये सलग दोन सप्ताहांच्या अखेरीस आयोजित करण्यात आला होता.(दि.१० ते १२ जानेवारी आणि दि. १७ ते १९ जानेवारी). ह्या कार्यक्रमाचा उद्देश त्यांचे साधनेविषयीचे आकलन सखोल करणे आणि वैयक्तिक साधनेत उत्साह निर्माण करणे हा होता. आत्मपरिक्षणाचे उपक्रम, अनुभवांच्या देवाण–घेवाणीची सत्रे, आणि गटचर्चांमुळे साधनेच्या विविध पैलूंविषयी त्यांचे आकलन अधिक दृढ झाले. ते आश्रमातील स्वयंसेवेच्या कामांमध्येही सहभागी झाले. संध्याकाळी काही सहभागींनी भजने गायली आणि ‘उपनिषद गंगा’ या मालिकेमधील एक भाग दाखविण्यात आला. सहभागींची शिस्त आणि उत्साह तसेच स्वयंसेवकांनी मनापासून केलेले प्रयत्न हृदयस्पर्शी होते.



## संयुक्त सचिवांचा ईशान्येकडील केंद्रांचा दौरा

बंधू ए.पी.दुराई (संयुक्त सचिव) यांनी दि. १६ ते २५ जानेवारी २०१४ दरम्यान आसाम आणि अरुणाचल प्रदेश येथील केंद्रांचा दौरा केला. दि. १६ रोजी सकाळी ते गौहत्तीला पोहोचले आणि पुढील काही दिवसांत त्यांनी गौहत्ती आश्रम, तेंगा खोरे उपकेंद्र, बोमडिला नहरलगुन, झिरो, पसिघाट, उ. लखिमपुर आणि दिब्रुगढला भेटी दिल्या. या ठिकाणी अभ्यासींबरोबर उपयुक्त अशी परस्पर–संवादी सत्रे घेण्यात आली आणि खुल्या सत्रांचेही आयोजन करण्यात आले.

विभागप्रमुख बंधू ईश्वर प्रसाद, बंधू अरुण पाठक, विभागप्रमुख बंधू धनिचंद व भगिनी ज्योत्स्ना हे सर्वजण या भेटीदरम्यान त्यांच्या समवेत होते. अभ्यासी आणि प्रशिक्षकांना गुरुदेवांच्या समीप आणणे हा या भेटीचा मुख्य उद्देश होता. दि. १९ रोजी झालेल्या प्रशिक्षकांच्या सभेतही या विषयी चर्चा झाली.

प्रशिक्षकांच्या दोन बैठकींमध्ये त्यांचे स्वतःच्या साधनेचे आकलन तसेच गुरुदेवांशी असलेले नाते अधिक बळकट होण्याची आवश्यकता यांवर भर देण्यात आला. आपण जेथे जातो तेथे गुरुदेव आपल्यावर लक्ष ठेऊन आहेत आणि पावलोपावली मार्गदर्शन करीत आहेत असे या गटाला जाणवले.

## विभागीय मेळावा, कोलकाता, प. बंगाल

दि. २१–२२ डिसेंबर २०१३ दरम्यान एक दोन दिवसीय मेळावा आयोजित करण्यात आला होता. बांदेल, रानिगंज, खरगपूर कृष्णनगर, असनकोल, चित्तरंजन, बरनपूर, कूचबिहार आणि दार्जिलिंग अशा प. बंगालच्या विविध भागातून साठ अभ्यासी या मेळाव्यास उपस्थित राहिले. साधनेच्या विविध पैलूंवर भर देणाऱ्या, बंगाली भाषेत झालेल्या या कार्यक्रमाचा केंद्रबिंदू सहजमार्गाचे दहा नि–यम हा होता. अभ्यासींच्या चिंता आणि प्रश्न संबोधित करण्यास या मेळाव्याचे सहाय्य झाले. बंगाली भाषांतर गटास, त्यांच्यासमोरील मोठया प्रमाणावर करायच्या कामाचा अंदाज घेण्यास आणि त्याचे नियोजन करण्याससुद्धा या कार्यक्रमाची मदत झाली. पूर्ण दोन दिवसांच्या मेळाव्यात आनंदाची आणि बंधुत्वाची भावना जाणवत होती आणि सर्वजण उत्साही आणि पुनरुज्जिवित होऊन परतले.



## यू–कनेक्ट कार्यक्रम, जयपूर, राजस्थान



सहजमार्ग पद्धतीचा परिचय विद्यापीठे, महाविद्यालये इत्यादि ठिकाणी करून देऊन युवकांमध्ये बदल घडवून आणणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. दि. १९ जानेवारीस झालेल्या सत्रांदरम्यान 'यू–कनेक्टची यशोगाथा– मलिबा' याची स्वयंसेवकांना ओळख करून देण्यात आली. तेथे हा कार्यक्रम गुरुदेव आणि बंधू कमलेश यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आणि राबविण्यात आला होता. कार्यक्रम सुनियोजित पद्धतीने राबविण्याचा समावेश असलेली कार्यप्रणाली पुरविण्यात आली. एका अभ्यासीने हा कार्यक्रम त्याच्या संस्थेमध्ये मध्ये सुरू करण्याबाबत पुढाकार घेतला. यामुळे जुलैमध्ये नवीन शैक्षणिक वर्षात महाविद्यालयांशी संपर्क साधण्याआधी एक उत्तम असा शिकण्याचा अनुभव मिळेल.




## समन्वय प्रशिक्षण कार्यक्रम,

### पनवेल आश्रम, मुंबई

दि. १२ ते १६ डिसेंबर दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्र‐मात संपूर्ण महाराष्ट्रातील सुमारे पन्नास अभ्यासी सहभागी झाले होते. दैनंदिन जीवनात वापरण्याचे एक साधन म्हणून 'समन्वयाची' ओळख करून देण्यात आली. समन्वय आणि बंधुत्व यांवरील कार्यशाळांमुळे तसेच आत्मपरिक्षण, लक्षपूर्वक ऐकणे आणि हृदयापासून बोलणे यांच्याद्वारे समन्वयाची कला आत्मसात करणे सहभागींना शक्य झाले. जी. आय. टी. पी. मोड्युल वरील कार्यशाळेमुळे त्यांना समन्वयाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. कार्यक्रमाचा शेवट करताना केंद्रप्रमुखांनी सर्वांना आवाहन केले की गुरुदेवांनी दिलेल्या संधीचा पूर्णपणे लाभ घ्यावा.

## झिरो आश्रम, अरुणाचल प्रदेश

## प्रकाशाचे केंद्र





लोअर सुबानसिरी जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण झिरो हे ५००० फूट उंचीवर वसलेले आहे. दूरपर्यंत पसरलेल्या डोंगराळ क्षेत्रामुळे निसर्गाचे विस्मित करणारे दृष्य नजरेस पडते. राज्याची राजधानी इटानगर येथून हे ठिकाण सुमारे १८० कि.मी. अंतरावर असून आसाममधील उ. लखिमपूरच्या जवळ असणाऱ्या लिलाबारी या विमानतळापासून १७६ कि.मी. दूर आहे. येथील हवामान हिवाळ्यामध्ये अत्यंत थंड असून उन्हाळ्यामध्ये बेताचे असते. येथील लोकसंख्या सुमारे २५,००० असून अपातानी नावाच्या एक स्थानिक जमातीचे येथे वास्तव्य आहे. दोनयी–पोलो या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सूर्य व चंद्राची ही जमात पूजा करते.

१९८५ मध्ये अरुणाचल प्रदेशाच्या फळबागायत विभागात काम करणारे बंधू के.एन. तिवारी (मूळचे उत्तराखंडचे) बदली होऊन झिरो येथे आले. सप्टेंबर १९८६च्या एका संध्याकाळी टेकडीवर फिरायला गेले असताना ध्यानासाठी बसावे असे त्यांना अचानक वाटले. आपल्या (गुरुदेवांप्रतीच्या) प्रेमाचे प्रतीक म्हणून तेथे आश्रमाची निर्मिती करावी असे त्यांनी ठरविले. १९८७मध्ये संपूर्ण टेकडीच्या वरील भागास कुंपण घालण्यात आले. नंतर इतर प्रार्थनास्थळे या जमिनीवर निर्माण झाली. घरा–घरांमध्ये फिरून लोकांमध्ये सहज मार्गाच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्याचे काम त्यांनी सुरू केले. १९९२ नंतर लोकांचे कुतूहल लक्षात घेऊन बंधू पुरुषोत्तम अग्रवाल (उ. लखिमपूर), बंधू ईश्वर प्रसाद अग्रवाल (तिनसुखिया) व बंधू के. बी. चक्रवर्ती (इटानगर) या प्रशिक्षकांना त्यांनी अभ्यासींना मदत करण्याची विनंती केली.



बंधू तिवारींच्या निवासस्थानी जशी अभ्यासींची संख्या वाढली, तशी आश्रमाची आवश्यकता भासू लागली. दि. १२ सप्टेंबर १९९३ रोजी आधी ठरविलेली जमीन अधिकृतपणे श्री राम चंद्र मिशनला देण्यात आली. गुरुदेवांनी या ठिकाणी बंधू ईश्वर प्रसाद यांची नियुक्ति केली. त्यांनी आश्रमाच्या बांधकामाची परवानगी दि. ४ जुलै १९९४ रोजी दिली. डोंगराळ व दुर्गम अशा या ठिकाणी आश्रमाच्या उभारणीचा प्रकल्प अत्यंत अवघड होता; परंतु केवळ इच्छाशक्ती आणि प्रेमाच्या जोरावर अभ्यासींना हा आश्रम बांधणे शक्य झाले.

बंधू एस.ए. सारनाद (एस.आर.सी.एम.चे त्या वेळचे सचिव) यांच्या हस्ते दि. १४ सप्टेंबर १९९६ रोजी आश्रमाचे उद्घाटन झाले. जवळपासच्या केंद्रांमधून सुमारे ७० अभ्यासी या समारंभासाठी उपस्थित होते. जुलै २००३ मध्ये बंधू यु. एस. बाजपेयी (सचिव, एस.आर.सी.एम.) यांनी या आश्रमाला भेट दिली. जरी मंदिर कमिटीने औपचारिकपणे मिशनला जमीन दिली असली तरी २००० साली अरुणाचल प्रदेशच्या सरकारला जमीनीकरीता एक अर्ज देण्यात आला. शेवटी १८९० चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन मिशनला देण्यात आली.

आश्रमाची इमारत दोन मजली असून तळ मजल्याचे क्षेत्रफळ १२२ चौ.मी. आहे. तळ मजल्याचा वापर निवासकक्ष म्हणून केला जातो. पहिल्या मजल्यावर शयनकक्ष, पाहुण्यांची खोली, दिवाणखाना/भोजनकक्ष तसेच प्रसाधनगृह व स्वयंपाकगृह या समवेत गुरुदेवांचा कक्ष आहे.

ध्यानगृह हे ११९ चौ.मी. क्षेत्रफळाचे, अस्थायी स्वरूपाचे असून त्यावर सी.जी.आय. शीटचे छप्पर आहे. आश्रमाच्या भोवतालच्या भिंती चिरलेल्या बांबूंना एकत्र विणून, त्यांच्या मोठ्या चटया बनवून तयार करण्यात आल्या आहेत. सध्या अभ्यासींची संख्या ऐंशी असून रविवारच्या सत्संगासाठी सुमारे वीस ते पंचवीस अभ्यासी उपस्थित असतात. अरूणाचल प्रदेशातील दूरवरच्या ठिकाणी मिशनला पोहोचविण्याचे काम झिरो आश्रम निश्चितच करीत आहे.

To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org
© 2014 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. “Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", “SRCM”, “Constant Remembrance” and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.